वाचले:-

क्रमांक १ – आदेश क्र. जशुके/पापु/१९३/२०१८, दि.०७/०६/२०१८

क्रमांक २ – मा.आयुक्त यांचेकडील दि. ११/०९/२०१८ रोजीचा मान्य प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८
पाणीपुरवठा विभाग
क्र.पापु/मुख्य/ ११२/२०१८
दि. ११/ ०८ /२०१८

विषय:- पाणीपुरवठा धोरण
जलमापकाचे रिडींग न घेता येणा-या ग्राहकांचे पाणीबीलाबाबत..

**आदेश,**

वाचले क्र.१ नुसार "एखाद्या ग्राहकाचा मीटर नादुरूस्त झाल्यामुळे किंवा अन्य कारणांमुळे बदलला तर, अशा ग्राहकांना पुढील मीटर रिडींगनुसार थकीत कालावधीचे सरासरी बिल देण्याचे धोरण यापुढेही चालू राहील," असे निर्देश नमूद आहेत.

पाणीपुरवठा विभागाने Non-metered नळजोडांचे प्रमाण बरेच कमी केलेले आहे. तथापि, अद्यापही काही प्रमाणात Non-metered नळजोड आहेत. तसेच जे Metered Connections आहेत. त्यांचे जलमापकांचे (Water meter) खालील कारणांमुळे Reading घेता येऊ शकत नाही.

१. मीटर बसविला नाही (Non Meter)
२. मीटरचे जागेवर मीटर आढळून आला नाही.
३. मीटर बंद आहे.
४. मीटर तुटलेला / खराब आहे.
५. मीटर गाडलेल्या अवस्थेत आहे.
६. घर बंद आहे.
७. मीटर अश्या ठिकाणी आहे त्यामुळे रिंडीग घेता येत नाही.
८. मीटर रिंडीगचा फोटो नीट दिसत नाही.
९. मीटर उलटा बसविला आहे.
१०मीटरच्या चेंबरवरील झाकण जास्त जड आहे.
११इतर कारणे -----------------------------------

याबाबत, पाणीपुरवठा विभागामार्फत सदर ग्राहकांना जलमापक (Water meter) स्वखर्चाने दुरूस्त करणेबाबत नोटीसा दिल्या जातात.त्यानंतर ग्राहक जलमापक विकत आणून / दुरूस्त करून नळजोडास बसवतो व तदनंतर पुढील तीन महिन्यांच्या पाणीवापराची सरासरी काढून सदर सरासरी पाणीवापर पुर्वलक्षी प्रभावाने घेऊन देयक दिले जाते. तथापि, अशा प्रकारे पुढे येऊन मीटर दुरूस्त करून किंवा नवीन बसविणेसाठी ग्राहक पुढे येत नाहीत. त्यामुळे मीटर नादुरूस्त – Bill Zero अशा प्रकारे प्रत्येक Cycle ला १५०० च्या दरम्यान ग्राहकांना देयके वितरीत होतात व याबाबत तक्रारी सुरू होतात.

उपरोक्तप्रमाणे परिस्थिती तसेच ग्राहकांची संख्या याचा विचार करता वाचले क्र.२ ला अनुसरून मी आयुक्त, असे आदेश देत आहे की, अशा ग्राहकांच्याबाबत खालीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरावी.

५. अ). नळजोडांचा जलमापक (Water meter) बंद पडला असे निदर्शनास आलेनंतर किंवा उपरोक्त कारणांमुळे रिडींग घेता येत नसेल तर पाणीवापर १५० Lpcd व प्रति सदनिका ५ व्यक्तीने काढून त्यानुसार पुढील दोन Reading Cycles ची पाणीबीले देण्यात यावीत.

ब). बिगर निवासी नळजोडांच्या जलमापकाबाबत रिडींगचा प्रश्न उपस्थित झाल्यास खालीलप्रमाणे पाणीवापर घेऊन पाणीबीले देण्यात यावीत..

| बिगर निवासी नळजोडाचा व्यास | प्रतिदिन वापर (किलो लिटरमध्ये) |
|---|---|
| १५ | ४ |
| २० | ८ |
| २५ | १२ |
| ४० | ३० |
| ५० | ५० |
| ७५ | ११२ |
| १०० | २०० |
| १५० | ४५० |

उपरोक्तप्रमाणे आकारणी करून पुढील दोन Reading Cycles ची पाणीबीले देण्यात यावीत.

(कृपया मागील पानावर)

६. दरम्यान, ग्राहकास जलमापक (water meter) दुरूस्त करण्यास / नवीन बसविण्यासाठी त्वरीत नोटीस देणे.

७. दोन Reading Cycles नंतरही ग्राहकाने जलमापक दुरूस्त केला नाही / योग्य कार्यवाही केली नाही/ नवीन बसविला नाही तर त्यांना पाणी वापराचे जे दर मीटर बंद / नादुरूस्त होताना लागू आहेत, त्या दराच्या दिडपट दर पुढील Cycles साठी आकारण्यात यावेत.

८. मीटर नादुरूस्त / बंद / रिडींग घेता येत नाही ही स्थिती ग्राहकास कळवून योग्य ती कार्यवाही करण्यास संगितल्यानंतर सहा महिन्यांनीसुध्दा जलमापक सुस्थितीत आणणेकामी काहीच कार्यवाही केली नाही, तर नळजोड बंद करणेत यावेत.

ग्राहकाने जलमापक (Water meter) सुस्थितीत केल्यानंतर / दुरूस्त केल्यानंतर / नवीन बसविल्यानंतर पुढील तीन महिन्यांच्या प्रत्यक्ष पाणी वापरानुसार सदर कालावधीतील सरासरी पाणीवापर मीटर बंद / नादुरूस्त / मीटर नाही या कालावधीसाठी गृहीत धरावा.

सदर कार्यपध्दती पुर्वलक्षी प्रभावाने वापरावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

प्रतः-

१. मह शहर अभियंता, पाणीपुरवठा व जलनिःसारण विभाग
२. सर्व कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग
३. सर्व उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग
४. सर्व संबंधित